पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ प्रभाग कार्यालय, निगडी-४४
अप्र/११/कावि/ ०६ /२०१४
दिनांक : ०२ /०१/२०१४

प्रति,
मा. ---- --------------- -
सदस्य/ सदस्या, अ प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
निगडी, पुणे-४११०४४

विषय: पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक ०८/०१/२०१४ रोजी आयोजित केलेबाबत.

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक ०८/०१/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता अ प्रभाग कार्यालयातील "राजमाता जिजाऊ सभागृह" येथे आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपली विश्वासू

प्रशासन अधिकारी
अ प्रभाग कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
निगडी, पुणे-४४

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

अ प्रभाग समिती

**कार्यपत्रिका क्रमांक १२**

दिनांक: ०८/०१/२०१४ वेळ: दुपारी १२.०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे जानेवारी २०१४ ची मासिक सभा बुधवार दिनांक ०८/०१/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता अ प्रभाग कार्यालयातील "राजमाता जिजाऊ सभागृह" येथे आयोजित करणेत आली आहे. सदर सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

विषय क्र.५ मा.प्रभाग अधिकारी यांचकडील पत्र क्र.अप्र/वि/कावि/जा/ ९५१/२०१३

दिनांक : ३१/१२/२०१३

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक २८४० दिनांक ०५/०२/२०१३ चे मान्यतेनुसार मे.श्रीयश सेल्स आणि सर्व्हिसेस कॉर्पो. रावेत, पुणे यांचेबरोबर अ प्रभाग कार्यालयाचे विद्युत विभागाकडे दोन हैड्रोलिक शिड्या/ वाहने भाडेतत्वावर पुरविणेबाबत ५ वर्षासाठी करारनामा करणेत आलेला आहे. त्यानुसार अ प्रभाग विद्युत विभागाकडे दोन हैड्रोलिक शिड्या/ वाहने भाडेतत्वावर पुरविणेत आलेले आहेत. सदर वाहनांचे भाडे देणेकामी सन २०१३-१४ महसुली बजेटमध्ये र.रु.२०,००,०००/- (वीस लाख) तरतुद करणेत आलेली होती. परंतु सदर रकमेतून दिनांक ०८/१०/२०१३ अखेर र.रु.१८,८७,१००/- खर्च झालेला असून र.रु.१,१२,९००/- इतकी शिल्लक आहे. सदरचे लेखाशिर्षावर सन २०१३-१४ अखेर हैड्रोलिक शिड्या/ वाहने भाडेतत्वावर पुरविणेकरिता आणखी र.रु.१८,००,०००/- (आठरा लाख) वाढीव तरतूद अपेक्षित आहे. याकरिता "ध्वनीक्षेपण व्यवस्था" या लेखाशिर्षामधून र.रु.१०,००,०००/- (दहा लाख) व "अ प्रभागांतर्गत मोकळया जागेवर तात्पुरते पुनर्वसन शेडसाठी वीजबील खर्च" या लेखाशिर्षामधून र.रु. ८,००,०००/- (आठ लाख) अशी एकुण र.रु. १८,००,०००/- (आठरा लाख) तरतूद "अ प्रभाग विद्युत विभागाकडे दोन हैड्रोलिक शिड्या/ वाहने भाडेतत्वावर पुरविणे" या लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

-----

प्रशासन अधिकारी
अ प्रभाग कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
निगडी - ४४

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ प्रभाग कार्यालय, निगडी-४४
अप्र/११/कावि/ ०६ /२०१४
दिनांक : ०२ /०१/२०१४